# कृषी उत्पन्न बाजार समिती, आटपाडी जि. सांगली

## नोकर भरती

**कृषी उत्पन्न बाजार समिती, आटपाडी जि. सांगली** यांच्या आस्थापनेवरील **कनिष्ठ लिपिक, नाईक (हेड प्युन), वॉचमन / शिपाई** या संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडून केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ :-** www.apmcatpadi.in

| अ. क्र. | पदाचे नाव | पद संख्या | आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपिक | २ | शासन मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी तसेच MS-CIT किंवा समतुल्य संगणक कोर्स प्रमाणपत्र आवश्यक. | S - ६<br>१९९०० - ६३२०० |
| २ | नाईक (हेड प्युन) | १ | एस. एस. सी ( १० वी ) उत्तीर्ण आवश्यक. | S - ३<br>१६६०० - ५२४०० |
| ३ | वॉचमन / शिपाई | १ | एस. एस. सी ( १० वी ) उत्तीर्ण आवश्यक. | S - १<br>१५००० - ४७६०० |

Mahabharti.in

## वेळापत्रक

| अ. क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी | दि. १७.०२.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून ते दि. २८.०२.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| २. | ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | ते दि. २८.०२.२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ३. | परीक्षा प्रवेश पत्र ऑनलाईन प्रिंट काढून घेणे | याबाबत संकेतस्थळावर सूचना प्रसिद्ध करण्यात येईल. |
| ४. | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | याबाबत संकेतस्थळावर सूचना प्रसिद्ध करण्यात येईल. |

* आवश्यकतेनुसार वरील वेळापत्रकात बदल झाल्यास याबाबत वेळोवेळी **www.apmcatpadi.in** या संकेतस्थळावर सूचना प्रसिद्ध करण्यात येतील. अशा सूचनांचे वेळोवेळी अवलोकन करण्याची उमेदवारांनी दक्षता घ्यावयाची आहे.

## परीक्षा शुल्क :-

सर्व पदांकरिता रु. ७५०/- परीक्षा शुल्क (विना परतावा) अधिक १८% जी.एस.टी. ( रु. १३५/-) असे एकूण रु. ८८५/-

## वयोमर्यादा :-

दिनांक २८-०२-२०२५ रोजी किमान वय १८ वर्षे आणि कमाल वय ३५ वर्षे आवश्यक.

# नोकर भरती संदर्भात महत्वाच्या सूचना खालील प्रमाणे

- सर्व पदांकरिता ऑनलाईन परीक्षा घेण्यात येईल.
- उमेदवारांनी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने सादर करावेत. अर्ज भरणा व परीक्षा शुल्क भरणा झाल्यावर प्राप्त होणाऱ्या अर्जाची प्रत उमेदवारांनी नोकर भरती होईपर्यंत स्वतःजवळ सांभाळून ठेवावी.
- अर्ज करतांना उमेदवारांनी वैध असलेला मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आय.डी. सक्रीय असला पाहिजे. तसेच मोबाईल क्रमांक हा (DND Activate) नसावा. संदेशवहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणीमुळे एस.एम.एस किंवा ई मेल उमेदवारांपर्यंत पोहचू शकत नाही, त्याकरिता कृषी उत्पन्न बाजार समिती, आटपाडी जबाबदार राहणार नाही.
- उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा हि कोणत्याही शैक्षणिक कागदपत्रांची पूर्व तपासणी / छाननी न करता घेण्यात येणार आहे. त्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे निवडीबाबत कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही. किंवा त्याबाबत तक्रार करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
- ऑनलाईन परीक्षेचे ठिकाण, दिनांक, परीक्षेचे माध्यम आणि अभ्यासक्रम बाबतची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
- उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना सत्य व अचूक माहिती भरावी, नोकर भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांची माहिती खोटी किंवा चुकीची आढळल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याकरिता उमेदवार स्वतः जबाबदार राहील.
- भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल, सूचना वगैरे www.apmcatpadi.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात

Mahabharti.in

येणार नसून या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करून घेण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे. परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार सभापती / सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती आटपाडी यांना राहतील व या संदर्भातील त्यांचा निर्णय अंतिम राहील. याबाबत कोणासही कोणताही दावा करता येणार नाही.

- उमेदवारांना अर्ज भरतांना काही अडचण किंवा शंका असल्यास संकेतस्थळावर दिलेल्या हेल्पलाईन क्रमांकावर फोन करून मदत घ्यावी.

SECRETARY A.P.M.C.ATPADI    CHAIRMAN A.P.M.C.ATPADI

AGRICULTURAL PRODUCE MARKET COMMITTEE 2-11-1972 ATPADI, DIST. SANGLI.

सचिव    सभापती

कृषी उत्पन्न बाजार समिती, आटपाडी जि. सांगली

Mahabharti.in